**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः12.05.2025** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरमध्ये 100पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याची भारतीय सैन्य दलांची माहिती
- ऑपरेशन सिंदूर भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक इच्छाशक्तीचं प्रतिक असल्याचं संरक्षणमंत्र्यांचं प्रतिपादन
- सिंधुदुर्गमध्ये राजकोट किल्ल्यावर उभारलेल्या छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पूजन
- श्रीलंकेवर मात करत भारतानं महिलांची तिरंगी क्रिकेट मालिका जिंकली

  आणि
- खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या खात्यात 80 पदकं; पदकतालिकेतील अव्वल स्थान कायम

**सैन्य दल पत्रकार परिषद**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातल्या दहशतवादी तळांवर केलेल्या हल्ल्यात 100 पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याची माहिती भारताच्या तिन्ही सैन्यदलांच्या प्रतिनिधींनी काल दिली. लष्करी कार्यवाही महासंचालक लेफ्टनंट जनरल राजीव घई, हवाई कार्यवाही महासंचालक एअर मार्शल ए. के. भारती आणि नौदल कार्यवाही महासंचालक व्हाइस ॲडमिरल ए. एन. प्रमोद यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत भारताच्या हवाई हल्ल्याविषयी आणि त्यानंतरच्या घटनाक्रमाविषयीचे तपशील समोर ठेवले. ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये कुख्यात दहशतवादी युसुफ अजहर, अब्दुल मलिक रौफ, मुदस्सिर अहमद यांचाही समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूरचा उद्देश पाकिस्तानातले दहशतवादी तळ उद्‌ध्वस्त करणं हाच होता, ही बाब भारताच्या तिन्ही सैन्यदलांच्या प्रतिनिधींनी अधोरेखित केली. या हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून नियंत्रण रेषेजवळ वारंवार झालेला गोळीबार, भारताच्या हद्दीत आलेले असंख्य ड्रोन्स, इतर तत्सम यंत्रं यामुळे भारतानं स्वसंरक्षणासाठी आणि प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानच्या सशस्त्र दलांच्या तळांना लक्ष्य केलं; या कारवाईत पाकिस्तानचे 35 ते 40 जवान मृत्युमुखी पडल्याचंही त्यांनी सांगितलं.दोन्ही देशांमध्ये झालेल्या शस्त्रसंधीनंतर काही तासांतच पाकिस्ताननं पुन्हा सीमेपलीकडून गोळीबार केला; या पार्श्वभूमीवर लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी परिस्थितीचा आढावा घेतला असून पाकिस्ताननं पुन्हा शस्त्रसंधीचं उल्लंघन केल्यास त्याला चोख प्रत्युत्तर द्यायचं पूर्ण स्वातंत्र्य लष्कराला दिलं असल्याचंही लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी सांगितलं.भारतानं आत्तापर्यंत केलेल्या कोणत्याही कारवाईचा उद्देश पाकिस्तानी सशस्त्र दलांना किंवा नागरिकांना लक्ष्य करणं हा नव्हता, तर तिथले दहशतवादी तळ उद्‌ध्वस्त करणं हेच भारताचं लक्ष्य होतं, असं या तिन्ही अधिकाऱ्यांनी सांगितलं. दरम्यान, दोन्ही देशांच्या लष्करी कार्यवाही प्रमुखांची आज दुपारी 12 वाजता चर्चा होणार आहे, असं लेफ्टनंट जनरल घई यांनी सांगितलं.

**बैठक**

भारत पाकिस्तानदरम्यानचा तणाव,पाकिस्तानबरोबर जाहीर केलेली शस्त्रसंधी आणि या शस्त्रसंधीबाबत झालेल्या सामंजस्य कराराचं पाकिस्तानकडून वारंवार होत असलेलं उल्लंघन या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कालही नवी दिल्लीतल्या निवासस्थानी महत्त्वाची बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, वायू दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी या बैठकीला उपस्थित होते.
इंट्रो

**राजनाथ सिंह**

ऑपरेशन सिंदूर ही केवळ लष्करी कारवाई नाही तर भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक इच्छाशक्तीचं प्रतिक असल्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. लखनऊ इथं ब्रह्मोस एरोस्पेस एकीकरण आणि परीक्षण सुविधेचं उद्घाटन काल राजनाथ सिंह यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून झालं; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले--------

**भारत में आतंकवाद घटनाये करने और कराने का क्या अन्जाम होता है? यह पुरे विश्व ने ऊरी की घटना के बाद देखा, जब हमारी सेना ने पाकिस्तान में घुसकर सर्जिकल स्ट्राइक की, पुलवामा के बाद देखा, जब बाला कोट पर एअर स्ट्राइक की गई, और अब पेहलगाम की घटना के बाद दुनिया देख रही है, कि जब भारत ने पाकिस्तान के भीतर घुसकर स्ट्राइक की है, आतंग बाद के खिलाफ, जीरो टोलीरयंस पर चलते हुए, हमारे यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने यह स्पष्ट कर दैया है की यह नया भारत है, जो आतंकवाद के खिलाफ सरहद के इस पार और उस पार, दोनों तरफ प्रभावी कारवाई करेगा, यह हमारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी ने यह स्पष्ट रूप से यह संदेश दे दिया।**

**मुख्यमंत्री**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण राजकोट इथं उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पूजन केलं.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. मालवण राजकोटमध्ये विक्रमी वेळात छत्रपती शिवरायांचा हा पुतळा उभा राहिला आहे. त्याची भव्यता आणखी अधोरेखीत करण्यासाठी आजूबाजूचा परिसर सुशोभित करण्याचं आणि शिवसृष्टी उभारण्याचं काम लवकरच सुरू होईल. त्यामुळं पर्यटन दृष्ट्या इथल्या भागाला अधिक महत्व येईल असं फडणवीस यावेळी म्हणाले. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून....

**गेल्या वर्षी 26 ऑगस्टला इथला पुतळा दुर्घटनाग्रस्त झाल्यानंतर सहा महिन्यात जगाला हेवा वाटेल असा पुतळा उभारण्यात येईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होतं, त्याप्रमाणे 31 कोटी 75 लाख खर्च करून 60 फूट उंचीचा हा ब्रॉंझ धातूचा पुतळा उभारण्यात आला आहे. हे पुतळा उभारण्याच काम मेसर्स राम सुतार आर्ट क्रियेशन्स यांनी उभारला असून याच्या मजबुतीसाठी आवश्यक ती काळजी घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुतळ्याच पूजन केल्यानंतर परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त**

**केलं. यावेळी शिवआरती देखील करण्यात आली. पुतळा उभारणीसाठी हातभार लावलेल्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.**

**बुद्धपौर्णिमा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुद्ध पौर्णिमेनिमित्त जगभरातील नागरिकांना आणि भगवान बुद्धांच्या अनुयायांना शुभेच्छा दिल्या आहेत. लोकांनी भगवान बुद्धांचे आदर्श त्यांच्या जीवनात स्वीकारावेत आणि शांततापूर्ण, सुसंवादी आणि विकसित राष्ट्र उभारणीत योगदान द्यावं अशी इच्छा राष्ट्रपतींनी त्यांच्या संदेशात व्यक्त केली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही बुद्ध पौर्णिमेनिमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा पवित्र दिवस भगवान बुद्धांच्या जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाणाचं प्रतीक आहे, असं उपराष्ट्रपतींनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे.

**प्राणी-गणना**

वन विभागाच्या वतीनं दरवर्षी वैशाख पौर्णिमा अर्थात बुध्द पौर्णिमेला शासकीय यंत्रणा आणि वन्य जीव तज्ञांच्या सहभागातून प्राणी गणना होते. कारण या पौर्णिमेला रात्रीचा कालावधी मोठा आणि चंद्रबिंबही खूप मोठं असतं. मात्र यंदा सर्वत्र ढगाळ वातावरणामुळं प्राणी गणनेत मोठा अडसर निर्माण झाला आहे. तरीही वनविभागानं विविध ठिकाणी प्राणी गणनेसाठी तयारी केली आहे.

**प्रशांत वाघमारे**

प्रत्येकाला हक्काचं घर मिळावं यासाठी पंतप्रधान आवास योजनेच्या दुस-या टप्प्याचं काम पुणे महानगरपालिकेनं हाती घेतलं असून या प्रकल्पासाठी  महापालिका एकंदर तीनशे कोटी रुपये खर्च करणार आहे. नागरिकांनी यासाठी ऑनलाईन पोर्टलवर अर्ज करावेत असं आवाहन पुणे महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी केलं आहे.

**केंद्र शासनाने  प्रधानमंत्री आवास योजना  2.0 जाहीर केलेली आहे. त्याच्यात सुद्धा आता आम्ही अर्ज मागवलेले आहेत. जवळ जवळ  9,000 अर्ज ऑनलाईन लोकांनी केलेले आहेत. याच्या मध्ये आम्ही  या वर्षी 4,700 घर बांधण्याचं नियोजन केलेले आणि जवळ जवळ शहराच्या प्रमूख 6 ठिकाणी आम्ही घर बांधणार आहोत.काही ठिकाण आहेत बालेवाडी, कोंढवा, धानोरी, हडपसर, वडगाव खुर्द आणि खराडी तर नागरिकांनी जास्तीत जास्त  अर्ज करून या योजनेचा फायदा घ्यावा अशी महानगर पालिकेतर्फे  आपल्या सगळ्यांना विनंती आहे.**

**चिपळूण-वस्तुसंग्रहालय**

कोकणची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिपळूणमधील लोकमान्य टिळक स्मारक वाचनमंदिराच्या रामभाऊ साठे वस्तुसंग्रहालयाचं उद्घाटन काल रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं. हे वस्तुसंग्रहालय म्हणजे रत्नागिरी जिल्ह्याचा अतिशय महत्त्वाचा ठेवा असल्याची भावना सामंत यांनी या वेळी व्यक्त केली. रत्नागिरी इथल्या मुख्य बसस्थानकाच्या नव्या इमारतीचंही लोकार्पण काल पालकमंत्री उदय सामंत, गृह राज्यमंत्री योगेश कदम, रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत पार पडला. 1958 यावर्षी उभारलेल्या या बसस्थानकाच्या नूतनीकरणाचं काम 2014 पासून विविध कारणांमुळं रखडलं होतं;

**क्रिकेट**
महिलांच्या मर्यादित षटकांच्या तिरंगी क्रिकेट मालिकेतील अंतिम सामन्यात भारतानं श्रीलंकेचा 97 धावांनी पराभव करत ही मालिका जिंकली. कोलंबो इथं काल झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं श्रीलंकेसमोर विजयासाठी 343 धावांचं कठीण लक्ष्य ठेवलं होतं; मात्र श्रीलंकेचा संघ 49 व्या षटकात 245 धावाच करू शकला. भारताच्या स्मृती मंधनानं 101 चेंडूंत 15 चौकार आणि दोन षटकारांसह 116 धावा केल्या. स्मृती या सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**खेलो इंडिया**
बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राने 30 सुवर्ण 25 रौप्य आणि 25 कास्य अशी एकंदर 80 पदकांची कमाई करत पदकतालिकेतील अव्वल स्थान कायम राखलं आहे. योगासन स्पर्धेत पहिल्याच दिवशी महाराष्ट्राने पदकांचा चौकार ठोकला. मुलांच्या गटात रोहन तायडे, अंश मयेकर तर मुलींच्या गटात रुद्राक्षी भावे आणि प्रांजलं व्हान्ना या जोड्यानी सुवर्णपदकांवर आपलं नाव कोरलं. याशिवाय महाराष्ट्राच्या संघाने आणखी दोन रौप्य पदकांची कमाई केली.भारोत्तोलनात सांगलीच्या यश खंडागळेने 67 किलो गटात सुवर्ण पदक मिळवलं.  टेनिसमध्ये एकेरीत अर्णव पापरकर, ऐश्वर्या जाधव यांनी उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आजपासून ॲथलेटिक्स आणि कुस्ती स्पर्धेचा थरार सुरू होणार असून यातही महाराष्ट्राला पदकांची अपेक्षा आहे.

**पाऊस-विविध**
नाशिकमध्ये काल दुपारनंतर वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. या पावसात सुमारे पन्नास वृक्ष कोसळले. रस्त्यांवरून वाहत असलेल्या पाण्यामुळं शहराच्या अनेक भागांमध्ये वाहतूक कोंडी झाली होती. बुलडाणा जिल्ह्यातही पावसानं मोठं नुकसान झाल्याचं वृत्त आहे.

**हवामान**
मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.